कि.दि.अर्ज क्र.१३/२०२५
नि.क्र.१० सोबत

**पुढील सर-तपास अर्जदारतर्फे श्री. पी.एन. पाटील विधिज्ञ यांचेमार्फत साक्षीदारास शपथ दिल्यावर सुरू दि.१०.१२.२०२५**

१७. आता मला माझे पुराव्याचे शपथपत्र नि.१० दाखविण्यात आले. त्यावर माझा अंगठा आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला असून तो बरोबर आहे. मला आता निशाणी ३ सोबतचे अनुक्रमांक १ ते ७ चे कागद दाखविणेत आले. त्यांना अनुक्रमे **निशाणी १२ ते १८** देण्यात आली.

**उलटतपास जाबदारतर्फे सरकारी वकील श्री. एम.बी.कुलकर्णी यांचेकडून**

१८. माझी मुलगी साक्षी इयत्ता नववीला आहे. मला मुलीच्या शाळेचे नांव माहित नाही. साक्षी माझ्यासोबत राहते. मला तिची जन्मतारीख माहित नाही. ही केस कशासाठी दाखल केली आहे हे मला माहित नाही. माझ्या सरतपासामध्ये काय लिहिले आहे हे मला माहित नाही. (सदरची साक्षीदार सरकारी वकीलांनी प्रश्न विचारल्यानंतर शांत उभी राहते व ती विचारलेल्या प्रश्नांना उशीराने उत्तर देते). हे म्हणणे खरे आहे की, सदर केस ही दाखल करण्याचे काम माझ्या आईवडीलांनी पाहिले आहे व त्याविषयी मला व्यक्तिश: माहिती नाही. ज्या जमीनीविषयी केस दाखल केलेली आहे त्या जमीनीचा गट क्रमांक मला माहित नाही. व्यवहार किती रूपयांना ठरविला आहे हे मला माहित नाही. इसाराची रक्कम रू.२,०००/- मिळाली आहे.

अर्जदारांच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

10.12.2025

( र.रा.भागवत)
जिल्हा न्यायाधीश क्र.१, विटा

विटा
दि.१०.१२.२०२५

**शपथेवर सुरू**

**पुढील उलटतपास जाबदारतर्फे सरकारी वकील श्री. एम.बी.कुलकर्णी यांचेकडून**

१९. माझे पती जिवंत नाहीत. माझे सासरे जिवंत आहेत. मला एक दिर व एक नणंद आहे व आम्ही सर्वजण एकत्र रहातो. साक्षी इयत्ता नववीमध्ये आहे व ती न्यू इंग्लीश स्कुल निगडी, ता.शिराळा येथे शिकत आहे. मुलीच्या शाळेची फी भरावी लागते. आम्ही जमीन ५,६५,०००/- ला विकणार आहे. जमीन खरेदी करणार आमचे नातेवाईक आहेत. सदरची जमीन सध्या माझे सासरे कसतात. हे म्हणणे खरे आहे की, मुलीच्या शिक्षणासाठी लागणा-या खर्चाचा तपशिल या प्रकरणात लिहीलेला नाही. आम्ही ही जमीन मनिषा तानाजी सुर्यवंशी यांना विकणार आहे व आम्ही त्यांना साक्षीदार म्हणून तपासणार आहोत. आम्ही आलेल्या पैशातून काही रक्कम मुलीच्या नावे तिच्या भविष्याच्या दृष्टीने ठेव म्हणून ठेवायला तयार आहोत.

**उलट तपास पुर्ण**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

25.03.2026

( र.रा.भागवत)

जिल्हा न्यायाधीश क्र.१, विटा

विटा

दि.२५.०३.२०२६